# सायबर सिक्युरिटीसाठी घडवले ४५ प्रशिक्षक

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

ऑनलाइन मार्केटिंगच्या ट्रेंड व सवलतींमुळे वाढलेले ऑनलाइन व्यवहार, स्मार्टफोनमुळे सोशल मीडियाचा सहज सुरू असलेला वापर यामुळे सर्वसामान्य तंत्रज्ञानाशी जोडले गेले आहेत. मात्र, सर्वसामान्यांमध्ये असलेल्या निरक्षरतेचा गैरफायदा घेऊन फोफावलेल्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी नागरिकांना सायबर सिक्युरिटीदृष्ट्या सजग करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या सायबर सिक्युरिटी केंद्राच्यावतीने ४५ तज्ज्ञ प्रशिक्षक घडवले आहेत.

सायबर क्राइम ही सध्याची देशातील गंभीर समस्या बनली आहे. त्यामुळे सायबर सिक्युरिटी ही नव्या जगाची गरज बनली आहे. शिवाजी विद्यापीठस्तरावर या क्षेत्रातील तज्ज्ञ प्रशिक्षकांची फळी तयार करून भविष्यात विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाच्या परिघातच 'सायबर सिक्युरिटी' हा विषय कार्यान्वित करण्यासाठी विद्यापीठाने पहिले पाऊल उचलले आहे. सेंटर ऑफ एक्सलन्सी सायबर सिक्युरिटी हे देशातील पहिले केंद्र विद्यापीठातर्फे सुरू केले आहे. एक नोव्हेंबरपासून या केंद्रातील कामकाजाला सुरुवात झाली असून, गेल्या दीड महिन्यात या केंद्राच्या माध्यमातून ४५ प्रशिक्षकांना सायबर सिक्युरिटीचे तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले आहे. केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयातर्फे या केंद्रासाठी सात कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात दोन कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या

## विद्यापीठाची डिजिटल साक्षरता मोहीम

ऑनलाइन आर्थिक व्यवहार करताना सुरक्षिततेचे महत्त्व लोकांना कळावे यासाठी या केंद्राद्वारे शास्त्रीय माहिती तळागाळात पोहोचवण्यात येणार आहे. पुढील तीन वर्षांत दोन हजार प्रशिक्षक तयार करून सायबर सिक्युरिटीअंतर्गत विविध कोर्सेसची निर्मिती केली जाणार आहे.

– डॉ. आर. के. कामत,
संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख

या केंद्रातर्फे सायबर सिक्युरिटीबाबत बनविण्यात येणारा अभ्यासक्रम देशातील सर्व केंद्रांमध्ये या विषयाशी संबंधित अभ्यासक्रमांमध्ये समाविष्ट होणार असल्याने ही महत्त्वाची जबाबदारी विद्यापीठाच्या टेक्नॉलॉजी विभागाकडे आली आहे.

सायबर गुन्ह्यांचा आलेख वाढला आहे. माहिती तंत्रज्ञानाचे स्रोत हाताळताना सर्वसामान्य नागरिकांचे सोशल मीडियावरील जग सुरक्षित राहावे यासाठी जागरूकता व साक्षरतेबाबत उपाययोजना निर्माण करण्यासाठी संशोधनाच्या पातळीवरही विद्यापीठात काम केले जाणार आहे. येत्या वर्षभरात १५ उपक्रमांचे नियोजन केले आहे.

लोकमत

# ‘विश्वकोश’च्या माध्यमातून ज्ञानसंस्कृती : करंबळेकर



कोल्हापुरात मंगळवारी शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागातर्फे आयोजित कार्यशाळेत मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष दिलीप करंबेळकर यांनी मार्गदर्शन केले.

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ हे ज्ञानमंडळांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विद्वतजणांना एकत्र करून नवी ज्ञानसंस्कृतीची निर्मिती करीत आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष दिलीप करंबेळकर यांनी मंगळवारी येथे केले.

विश्वकोश निर्मिती मंडळ आणि शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित आधुनिक इतिहास ज्ञानमंडळाच्या नोंदलेखक कार्यशाळेत ते बोलत होते. विद्यापीठातील इतिहास अधिविभागामधील या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विभागाच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या. अध्यक्ष करंबेळकर म्हणाले, मातृभाषेतून मिळालेले ज्ञान परिवर्तनास पोषक असते; त्यामुळे इतिहास लेखकांनी तटस्थपणे नोंदलेखन करून ते पुढील पिढ्यांसाठी ज्ञानसंचित राहील, याची काळजी घ्यावी. डॉ. भारती पाटील म्हणाल्या, व्यक्तीची सामाजिक व राजकीय भूमिका इतिहासातून घडत असते, त्यासाठी निष्पक्ष इतिहास लेखन करावे. यावेळी आधुनिक इतिहास ज्ञानमंडळाच्या फलकाचे अनावरण प्रमुख उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. विश्वकोश मंडळाचे सदस्य डॉ. अरुणचंद्र पाठक, विद्याव्यासंगी सहायक संपादक सरोजकुमार मिठारी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, मराठी विभागाचे प्रमुख डॉ. राजन गवस, डॉ. नीलांबरी जगताप, उमाकांत खामकर उपस्थित होते.